भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ९८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०२/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक ०४/०८/२०१६ चे १६.३० ते ०५/०८/२०१६ चे १०.०० वा. दरम्यान. यातील अर्जदार गणेश परसराम वाढई वय ५५ वर्ष, रा. भिलेवाडा शासकीय बिडी कामगार दवाखाना भंडारा यांनी नमुद घटणा स्थळी कार्यालयीन वाहन महीन्द्रा जिप क्र. एमझेड व्ही ९२०२ ही पार्क करुन घरी गेले व दुसऱ्या दिवशी सकाळी येवुन पाहीले असतांना जिप मध्ये लागलेली एक्साईड कंपनीची बॅटरी, झेडएससीओ–एमएच डी ०८८० किंमती ५,०००/–रु. प्लॉस्टीक स्टुल ४ नग किंमती ४००/–रु., प्लॉस्टीक १ खुर्ची असा एकुण ७,६००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने चौकाशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गुरव पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) बिनापरवाना ध्वनी वाहक वादय लावुन आदेशाचे उल्लघंन केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०८/०२/२०१७ चे २०.४० वा. दरम्यान. यातील फिर्यादीने मिळालेल्या माहीतेच्या आधाराने घटनास्थळी जावुन पाहाणी केली असता यातील तीनही आरोपीतांनी बिनापरवाना डी. जे. ध्वनी वाहक वादय लावुन मा. जिल्हाधीकारी सा. भंडारा यांचे कलम ३७(१)(३)म. पो. का. आदेशाचे उल्लघंन केल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १३५ म.पो.का भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) कुऱ्हाडीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक ०८/०२/२०१७ रोजी १५.४४ वा. दर. यातील आरोपीने जखमी फिर्यादीला 'तु माझ्या मुली सोबत अंधारामध्ये काय करतोस' या कारणा वरुन कुऱ्हाडीने डोक्यावर मागील बाजुला, दोन्ही हातावर मारुन जखमी केल्याने फिर्यादींचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोस्टे कारधा कलम ३२४ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो. स्टे. कारधा हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०८/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ४९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ४४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.